www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118



■ नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी...

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मुंबई सेन्ट्रल रेल्वे टर्मिनस येथून ४२ लाख जप्त

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७१ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## अपक्षांसह विविध १५८ पक्षांचे ४ हजार १३६ उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात !

● ठाणे, यश सावंत :

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर एकूण १५८ लहान-मोठे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी सहा मोठे पक्ष दोन आघाड्यांचा भाग म्हणून निवडणूक लढवत आहेत.

भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील महायुतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस आहेत. तर काँग्रेस, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार हे महाविकास आघाडीचा भाग आहेत.



मोठ्या राजकीय गोंधळानंतर २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, जो राजकीय इतिहासात 'पहाटेचा शपथविधी' म्हणून गाजतो. मात्र बहुमत चाचणीपूर्वीच २६ नोव्हेंबरला दोघांनाही राजीनामा द्यावा लागला. २८ नोव्हेंबर रोजी शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले. उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

सुमारे अडीच वर्षांनंतर शिवसेनेत आणि त्याच्या वर्षभरानंतर राष्ट्रवादीत बंडखोरी होऊन दोन्ही पक्ष चार पक्षांमध्ये विभागले गेले. या राजकीय पार्श्वभूमीवरच लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षांना आघाडी मिळाली. विधानसभा निवडणुकीसाठी यंदा एकूण १५८ विविध पक्षांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याची माहिती आयोगाच्या आकडेवारीच्या माध्यमातून स्पष्ट झाली होती. यंदाच्या निवडणुकीच्या रिंगणात तब्बल २ हजार ०८६ अपक्ष उमेदवार आपले नशीब आजमविणार असून इतर राजकीय पक्षांच्या तुलनेत ही संख्या सर्वाधिक आहे. राजकीय पक्षांची आकडेवारी लक्षात घेतली तर यंदा बहुजन समाज पक्षातर्फे सर्वाधिक एकूण २३७ उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.

पान २ वर



## दिल्लीत प्रदूषणाची पातळी वाढली; राज्य सरकारची केंद्र सरकारकडे 'ही' मोठी मागणी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारतातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) आणि पर्यावरण मंत्रालयाने स्थापन केलेल्या कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंट (CAQM) यांनी ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचा चौथा टप्पा (ग्रेप-४) लागू केला आहे.याच पार्श्वभूमीवर ग्रॅप-४ लागू झाल्यानंतर दिल्लीत अनेक निर्बंध लादण्यात आले आहेत.

पान २ वर

## पत्रकारांना 'गुलाम' म्हणणाऱ्या राहुल गांधीं यांच्या वक्तव्याचा मुंबई प्रेस क्लबने केला निषेध !

● मुंबई, राकेश गायकवाड :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना 'पत्रकार एक प्रकारे भाजपचे गुलाम' असे म्हटल्याने वाद निर्माण झाला आहे.

राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा निषेध करत मुंबई प्रेस क्लबने, 'असे वक्तव्य पत्रकारांच्या भावना दुखावते. राहुल



गांधी यांनी कधी भारतातील पत्रकारांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर, त्यांच्या समस्यांवर आणि एकूणच पत्रकारितेच्या समस्यांवर भाष्य केले आहे का?' असा सवाल केला आहे.

शनिवारी अमरावती येथे भाषण करताना राहुल गांधी म्हणाले, 'मी आरक्षण मर्यादा वाढवावी असे म्हटल्यास पंतप्रधान मोदी 'राहुल गांधी आरक्षणाच्या विरोधात आहेत' असा आरोप करतात. हे माध्यमेही प्रश्न न विचारता बातमी देतात. पत्रकार भाजपचेच आहेत. ते माझ्याकडे पाहून हसतात तेव्हा मला 'हो, आम्ही भाजपचे आहोत' असे म्हणत असल्यासारखे वाटते. यात त्यांचा काही दोष नाही. त्यांना काम करायचे आहे, पगार हवा आहे, मुलांना सांभाळायचे आहे, शिक्षण द्यायचे आहे, जेवायचे आहे.

पान २ वर

## 'हिंदुत्व तोडायला निघालेला राक्षस'; कालिचरण महाराजांवर मनोज जरांगेंची बोचरी टीका

● जालना, सचिन कदम :

'काही जाती पातीच आरक्षण नाही तर हिंदुत्व तोडायला निघालेला राक्षस आहे, अशी बोचरी टीका स्वयंघोषित कालिचरण महाराज यांनी नाव न घेता मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर केली होती. या टीकेला आता मनोज जरांगे पाटलांनी प्रत्युत्तर दिलं आहे. कालिचरण महाराज हे वाकडी तिकडी टिकली लावून हिंडणारे आहेत. हे फक्त सुपाऱ्या घेणारे आहेत, अशा पलटवार मनोज जरांगे यांनी केला आहे.





मनोज जरांगे पाटील एका वृत्तवाहिनीशी बोलत होते. यावेळी बोलताना मनोज जरांगे आणि कालिचरण महाराजांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. मी कट्टर हिंदू आहे. छत्रपतींच हिंदुत्व मानणारा आहे आणि ज्यांनी पक्षाचा ठेका घेतलाय, त्यांच्याबद्दल नाही बोलणार नाही, असा टोला मनोज जरांगेंनी कालिचरण महाराजांना लगावला.

जरांगे पुढे म्हणाले, आम्ही ज्या हिंदुत आहोत त्यातला कट्टर वर्ग मराठा आहे. तो आज अडचणीत आहे. आम्ही आरक्षण मागतो म्हणून त्याचा पक्ष पाडा असे म्हणत नाही, किंवा जातीवादही करत नाही. पण वाकटी तिकटी टिकली लावल्याने तुम्ही धर्माचे रक्षक होत नाही. हे फक्त टीकल्या लावून हिंडणारे आहेत. सुपाऱ्या घेणारे आहेत. याला नारळ पाहिजे, पैसे पाहिजे, जेवायला चांगले पाहिजे,गरीबाचे कष्टाचे, गरीबाचे कष्टाचे, अशी टीका मनोज जरांगे पाटलांनी कालिचरण महाराजांवर केली आहे. आमच्या मराठ्यांच्या समस्या त्यांना समजूत घ्यायच्या नाहीत. आमची लेकरं फाशी घेतातय. कदाचित त्याला आपला पक्ष चालवायचाच आणि त्याला पुढे तिकीट मिळणार असावं.पण एका जातीविषयी महाराजांच असं मतं आहे, हे मतदानाआधी कळालं हे बरंच झाल,असे देखील मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.तसेच आणखीण एखादी टीकली लाव मागून एखादी लावं,असा चिमटा देखील मनोज जरांगेनी कालिचरण महाराजांना काढला आहे.

## भाजप नेते विनोद तावडे यांच्यावर विरारच्या तुळींज पोलीस ठाण्यात FIR दाखल



● पालघर, सुचिता देशमुख :

महाराष्ट्रातील निवडणुकीपूर्वीच रोख घोटाळा उघडकीस आला आहे. निवडणूक आयोगाच्या तक्रारीवरून भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांच्याविरोधात पैसे वाटल्याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. विरारच्या तुळींज पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याशिवाय भाजपचे उमेदवार राजन नाईक यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने नऊ लाख रुपयांहून अधिक रोख आणि काही कागदपत्रेही जप्त केली आहेत.

याबाबत अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र किरण कुलकर्णी म्हणाले की, सर्व काही नियंत्रणात आहे, आम्ही कायद्यानुसार काम करू. त्यांनी सांगितले की, नालासोपारा येथे माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले होते. आचारसंहितेचे पालन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या निवडणूक यंत्रणेची उडणारी वाहनेही घटनास्थळी पोहोचली. फ्लाइंगने परिसराचा आढावा घेतला आणि काही जप्तीही केल्या

वास्तविक, वसई विरारमध्ये बहुजन विकास आघाडीने विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा आरोप केला होता. या आरोपावरून नालासोपारा, पालघरमध्ये भाजप आणि बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. या आरोपावर विनोद तावडे म्हणाले, "नालासोपारा मतदारसंघात बैठक सुरू होती. मतदानाचा दिवस आणि आचार-विचार यासह काय नियम आहेत. मतदानात काय होते, हे सांगण्यासाठी मी तिथे पोहोचलो होतो. मी पैसे वाटून घेतोय, असा विरोधकांचा समज होता. "जो कोणी ते पूर्ण करायचे आहे, निवडणूक आयोगाने याची निष्पक्ष चौकशी करावी.

## 'पैसे बाटेंगे जितेंगे, हा नोट जिहाद...', उद्धव ठाकरे बरसले

● मुंबई, विशाल कारंडे :

विधानसभा निवडणुकीला आता अवघे काही तास शिल्लक असतानाच भाजप नेते विनोद तावडे यांच्यावर नोटा वाटल्याचा आरोप होत आहे. बहुजन विकास आघाडीचे नेते क्षीतीज ठाकूर यांनी कार्यकर्त्यांसोबत विरारच्या हॉटेलमध्ये जाऊन धडक दिली, तसंच विनोद तावडे पैसे वाटत असल्याचा आरोप केला. याप्रकरणानंतर महाराष्ट्रातलं राजकीय वातावरण तापलं असतानाच उद्धव ठाकरे यांनी विनोद तावडे आणि भाजपवर निशाणा साधला आहे.



'हा व्हिडिओ निवडणूक आयोगाने बघायला पाहिजे, कारण काल अनिल देशमुखांचं डोकं आपोआप फुटलं. आज पैसे वाटतानाचा व्हिडिओ असेल तर हे जादूचे पैसे आले कुठून? कुणाच्या खिशात जात होते? तुळजा भवानीच्या दर्शनाला जात असताना माझी बॅग तपासली, मग यांच्या बॅगेतले पैसे तपासणार कोण? निवडणूक आयोगाने यात कठोर कारवाई केली पाहिजे. नाहीतर निवडणूक आयोगावर कारवाई करण्यासाठी आम्हाला वेगळा मार्ग बघावा लागेल', असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिला आहे.

'गुन्हा दाखल होऊन आरोपी फरार होता कामा नये. हे सगळं घडलं असेल आणि तुमच्याकडे व्हिडिओ असेल तर कारवाई झाली पाहिजे, कारण कायदा सगळ्यांना सारखा पाहिजे. तावडे तावडीत सापडले असतील तर त्यांनी आतापर्यंत सरकार कशी पाडली आणि कशी बनवली याचा पुरावा आहे. ज्या जागृकतेने हे कटकारस्थान घडलं असेल आणि उघडकीस आणलं असेल त्यांचं कौतुक केलं पाहिजे, पण हे त्यांच्यातलं गँगवॉर असू शकेल', असा संशय उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला.

## 'मला गोळ्या झाडा, मी मरणार नाही, तुम्हाला सोडणारही नाही'; हल्ल्यानंतर अनिल देशमुखांची प्रतिक्रिया

● मुंबई, धनश्री सट्टा :



महाविकास आघाडीकडून सलील देशमुख निवडणूक लढत आहेत. दरम्यान, सोमवारी सांगता सभा आटोपून परत येताना अनिल देशमुख यांच्या गाडीवर चार अज्ञात युवकांनी दगडफेक केल्याची घटना सोमवारी रात्री ८:३० वाजताच्या सुमारास घडली. या हल्ल्यात देशमुख जखमी झाले. दरम्यान, आता या घटनेवर देशमुख यांनी पहिली प्रतिक्रिया दिली.अनिल देशमुख यांनी भाजपाला इशारा दिला आहे. "या भारतीय जनता पार्टी वाल्यांना मी सांगू इच्छितो की, अनिल देशमुखांवर तुम्ही दगड मारा किंवा गोळ्या झाडा. अनिल देशमुख मरणार नाही आणि आम्ही लोक तुम्हाला सोडणारही नाही, असा इशाराही अनिल देशमुख यांनी भाजपाला दिला. काटोल मतदारसंघातील नरखेड येथे महाविकास आघाडीचे उमेदवार सलील देशमुख यांच्या प्रचाराची सांगता सभा आटोपून अनिल देशमुख हे तीनखेडा-भिष्णूर मार्गाने परत येत असताना काटोल-जलालखेडा रोडवरील बेल फाट्याजवळील ब्रेकरजवळ गाडी आली असता चार युवक अचानक गाडीसमोर आले.

## आता सप्तश्रृंग गड, कसारा, पिंपळगाव मार्गावर ई बस सेवा सुरू

● नाशिक, नितीन देवळेकर :

महाराष्ट्र ई वाहन धोरणानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागात नाशिक-बोरिवली मार्गावर १२ मीटरच्या ई बस चालविण्यात येत आहेत. तसेच नऊ मीटर ई बस सप्तश्रृंगी गड, नाशिक-कसारा मार्गावर चालविण्यात येत असून अतिरिक्त फेऱ्या सुरू करण्यात येत आहेत. याशिवाय, नाशिक-पिंपळगाव मार्गावरील प्रवाशांच्या सुविधेसाठी ई बस सुरू करण्यात आली आहे. या सेवेचा आरंभ बुधवारपासून होत असल्याची माहिती विभाग नियंत्रक अरूण सिया यांनी दिली.



राज्य परिवहन महामंडळाकडून ई वाहन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंतर्गत महामंडळाच्या नाशिक विभागात नाशिक, बोरिवली, कसारा, सप्तश्रृंगी गड या मार्गांवर ई बससेवा सुरू आहे. या ताफ्यात नव्याने १२ बस दाखल झाल्या आहेत. या बसची आसन क्षमता ४४ असून ती आरामदायी आहे. सदरची बससेवा वातानुकूलीत आहे. बसमध्ये दिव्यांची विशेष सुविधा आहे. प्रवासी सुरक्षिततेसाठी सीसीटीव्हीचीही सुविधा आहे. महिला सन्मान योजनेतंर्गत ५० टक्के, अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांसाठी ५० टक्के सवलत, अर्जुन -द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त पुरस्कारार्थींसाठी १०० टक्के, विद्यमान तसेच माजी विधानसभा, विधान परिषद सदस्य, शहीद सन्मान योजने अंतर्गत शहीद जवानांच्या वीरपत्नी यांना १०० टक्के सवलत या बस प्रवासासाठी देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत नाशिक-बोरिवली मार्गावर धावणाऱ्या नऊ मीटर ई बस या सप्तश्रृंगी गड, नाशिक- कसारा आणि नाशिक- पिंपळगाव मार्गावर धावत आहेत. त्यामुळे नाशिक -सप्तश्रृंगी गड मार्गावर सहा तर नाशिक कसारा मार्गावर दोन अतिरिक्त फेऱ्या सुरू होणार आहेत. नाशिक पिंपळगाव मार्गावर नव्याने ई बस सेवेच्या आठ फेऱ्या सुरू होत असल्याची माहिती सिया यांनी दिली. फेऱ्यांचा लाभ प्रवाश्यांनी घ्यावा, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

संपादकीय संपादक - राकेश शंकर गोरे

# म्हाताऱ्या शब्दांचा आरसा

यशस्वी, हुशार, घरंदाज आहे... पण तो दांभिक, आत्ममग्नशूल, संधिसाधूही आहे – जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी मध्यमवर्गाचे चरित्र यापेक्षा वेगळे नसणारच. सध्या निवडणुकांचा माहौल आहे. सर्व पक्ष त्यांच्या प्रचारनाम्यांसह सज्ज झाले आहेत. पण या धामधुमीत सर्वात दीन, दुर्लक्षित घटक तो मध्यमवर्गच. आपल्या लोकसंख्येतील तो तिसरा हिस्सा. या अर्थाने बहुजन आणि खरे तर लौकिकार्थाने वंचितही. तरी निवडणूकनाम्याचा त्याला भाग बनवावे असे कोणास वाटू नये हे दुर्दैवीच. विचारक्षम, बोलका, जनमताला हवे तसे वळण लावणारा, लावू शकणारा हा समाजघटक स्वप्न पाहणाराही. स्वप्नपूर्तीसाठी कष्ट उपसणारा, प्रसंगी कर्ज-उसनवारीतून हवे ते मिळवू पाहणारा. आयुष्यभर हप्ते / बँकांच्या ईएमआयच्या चरकात गुलामासारखा पिचणाराही तोच. महिन्याकाठी मिळणाऱ्या मेहनतान्यातील एक हिस्सा सरकारला बिनबोभाट देणारा सत्तेचा सर्वात मोठा करदाता वर्ग तोच. शहरातील बकाली, दुरवस्था, घुसमटून टाकणारा रोजचा काही तासांचा जीवघेणा प्रवास, त्यातील घुसमट, धक्काबुकी, मारामाऱ्या म्हणजे त्याच्या जीवनाचा नित्य नाइलाजच. महागाई, अनारोग्य, किमती कितीही वाढल्या तरी प्रसंगी पोटाला चिमटा देत घर चालवण्याच्या खस्ताही सर्वाधिक त्याच्याच वाट्याला. मध्यमवर्गीय कायम सामान्यच असतो आणि हा आम कधी तरी खास बनेल, असे त्याचे स्वप्न हे स्वप्नच बनून राहते. त्याच्यासाठी अल्प-स्वल्प का असेना आनंदवार्ता आताशी दुर्मीळच. पण त्याच्या मनाचा कोमेजलेला कोपरा पार करपून जाईल अशा संकटवार्तांच्या मालिकांनीच वातावरण भारलेले असणे हे शोचनीयच. सणासुदीला हटकून उजळणाऱ्या मध्यमवर्गासाठी यंदाचा दीपोत्सव फिकाच ठरला. ऐन उत्सवी दिवस भांडवली बाजारातील निराशा आणि नित्याच्या पडझडीत पोर्टफोलिओला झालेले नुकसान मोजण्यात त्याचे गेले. खरेदीचा नेहमी दिसणारा त्याचा उत्साहही मावळला. आता तर खरेदीच परवडेनाशी ठरेल अशा अस्मान गाठणाऱ्या महागाईची हताशा त्यावर स्वार होताना दिसत आहे.

महागाईतून महागाईकडेच जाणारे हे भीतीदायी दुष्टचक्र-त्याचा परीघ वाढत चालला आहे. शहरी मध्यमवर्ग वाढत्या महागाईने नित्योपयोगी चीज-वस्तूंवरील खर्चासाठी हात आखडता घेतो आहे. शहरी बाजारपेठांतील मागणी कधी नव्हेती तसलगपणे घसरत आहे. त्याची परिणती ग्राहकोपयोगी वस्तू-सेवांच्या उत्पादकांची मिळकत घटण्यात दिसत आहे. कुटुंबाच्या अंदाजपत्रकाला लागलेल्या कात्रीची झळ ही मागणीच घसरल्याने कंपन्यांच्याही उत्पन्नाला ज्याची पुढची परिणती शेअर बाजारातील कंपन्यांच्या समभागांच्या पडझडीला कारणीभूत. म्हणजे जाच पुन्हा भागधारक/गुंतवणूकदाराच्या भूमिकेत असलेल्या मध्यमवर्गालाच. या दुष्टचक्राचा नवा पैलू म्हणजे ग्राहक किमतीवर आधारित किरकोळ महागाई दराने चौदा महिन्यांतील गाठलेल्या सर्वोच्च स्तरावर जाण्याचा आहे. हा दर सरलेल्या ऑक्टोबरमध्ये ६.२ टक्क्यांवर जाणे, हे त्याच्या नियंत्रणाची भूमिका बजावणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या अंदाज-आडाख्यांचा फज्जा उडवणारा आहे. जोडीला ढासळत्या रुपयाच्या मूल्याचा परिणाम जोडून पाहिला तर मध्यम अवधीसाठी घोंघावत्या भयानक संकटाचे द्योतकच. पुन्हा मध्यमवर्गासाठी आशादायी असे 'विकसित भारता'चे स्वप्न आणि देशाच्या दीर्घोद्देशी आर्थिक यशोगाथेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण व्हावे असे हे घातसत्रच. हे असे अगदी विपरीत घडते आहे, पण ते कशामुळे? किंबहुना ते घडवून आणले गेले आहे काय, असा प्रश्नच यानिमित्ताने अधिक समर्पक ठरावा. भाज्यांच्या किमती वाढल्या. कांद्यापाठोपाठ, टोमॅटोचे भावही चढत गेले. हे लहरी हवामानाचे तडाखे अटळच आणि त्याचे घाव अधूनमधून बसतच असतात. ते तात्कालिक आहेत हे खरे मानले तरी वार्षिक तुलनेत भाज्यांच्या किमती ४२ टक्क्यांनी वाढाव्यात? कडधान्य,

# ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह - २०२४

**तुषार अरुण गांधी, कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अभिनेता किरण माने,**

कृषीभूषण विजय आण्णा बोराडे, दीप्ती नाखले, सचिन ईटकर यांची विशेष उपस्थिती व पद्मश्री पं. सतीश व्यास, पं. आदित्य कल्याणपूर, अर्शद अली खान व पूजा गायतोंडे यांच्या सांगीतिक सादरीकरणाने रंगणार यावर्षीचा ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह.

अंबाजोगाईः यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४० वे वर्ष असून चार दशकपूर्ती तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, चित्रकला स्पर्धा, बालआनंद मेळावा, कृषी परिषद, सुफी व गजल गायन शास्त्रीय संगीत सभा, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार वितरण, समारोप समारंभ संपन्न होणार आहे.

४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह अंबाजोगाई - २०२४




अंबाजोगाईत गेल्या ३९ वर्षांपासून सातत्याने यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने वैविध्यपुर्ण, वैचारिक, वाङ्मयीन, सांगितीक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार, कृषिविषयक प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा व प्रदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन असे विविध कार्यकम आयोजित केले जातात. अंबाजोगाई व मराठवाड्याचा सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, वैचारिक वारसा जोपासण्याचा व दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर २०२४ सोमवार, मंगळवार व बुधवार रोजी संपन्न होणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.

### उद्घाटन व कवी संमेलन

सोमवार, दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वा. या समारोहाचे उद्घाटन प्रख्यात गांधीवादी विचारवंत व महात्मा गांधी यांचे पणतू तुषार अरुण गांधी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून सुप्रसिद्ध अभिनेते व सिनेमा, मालिका निर्माते किरण माने हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

रात्रौ ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी ठाणे येथील ज्येष्ठ कवियत्री डॉ. प्रज्ञा दया पवार ह्या राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अकोला येथील सुप्रसिद्ध कवी गझलकार गोपाळ मापारी हे करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी डॉ. वृषाली किन्हाळकर - नांदेड, प्रा. सिसिलिया कार्व्हालो - वसई, संगिता बर्वे - पुणे, संजय चौधरी - नाशिक, बालाजी मदन इंगळे- उमरगा, रमजान मुल्ला- सांगली, जयंत चावरे - यवतमाळ, पूजा भडांगे - बेळगाव, सुनिती लिमये - पुणे, बालाजी सुतार - वर्धा (अंबाजोगाई), नारायण पुरी- छत्रपती संभाजीनगर, नितीन वरणकार - शेगांव व संजय आघाव - परळी यांचा सहभाग राहणार आहे.

### चित्रकला स्पर्धा व बाल आनंद मेळावा

मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहेत. सकाळी १० वा. बालआनंद मेळावा आयोजित केला असून मुलांच्या आत्मबळ निर्माण करणारे राजेंद्र बहाळकर पुणे हे अध्यक्ष असतील तर यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळ सराफ व आनंदवन वरोरा येथील धान्य रांगोळीकार चित्रकार प्रल्हाद ठक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील व शालेय चित्रकला स्पर्धेचे विजेते यांना परितोषिके प्रदान करतील. रांगभरण शालेय चित्रकला स्पर्धा त्या त्या शाळेत घेतल्या जात आहेत. तर ऐच्छिक विषय दिलेल्या ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांचे स्पर्धा कार्यक्रम स्थळी होतील. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल व दोन्ही गटातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उतेजनार्थ विजेत्यांना रोख बक्षीस पाहुण्यांच्या हस्ते दिले जातील.

. सायं. ८ वा. सुगम संगीताचे आयोजन केले आहे. मुंबई येथील सुप्रसिद्ध सुफी व गझल गायिका पूजा गायतोंडे यांचा मराठी, उर्दू, हिंदी गझल गायनाचा रंगरेझा हा संगीतबद्ध सादर करतील. साथसंगत - कीबोर्ड - मनोज राऊत, तबला - शंतनु मायी, ढोलक साथ योगेश ईंदोरिया यांचीअसेल.

### शेतकरी परिषद

२७ नोव्हेबर बुधवार वार रोजी सकाळी १०.३० वा. शेतकरी परिषदेचे आयोजन केले असून प्रयोगशील शेतकरी व प्रसिद्ध कृषी कार्यकर्ते तथा मराठवाडा शेती सहाय्य मंडळ खरपुडी - जालना येथील कृषिभूषण विजय अण्णा बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद होणार असून ते "माझी शेती कार्य कांहीं अनुभव" या विषयावर मार्गदर्शन करतील तर कृषी महाविद्यालय धाराशिव येथील माजी सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. मोहनराव बी. पाटील - छत्रपती संभाजीनगर हे "फळबाग पीक - लागवड पद्धती, संवर्धन व बाजारपेठ' या विषयावर मार्गदर्शन करतील तर आवाड शिरपूर ता. अंबाजोगाई येथील ऊस उत्पादक व अभ्यासक पांडुरंग आवाड हे "ऊस लागवड - स्वअनुभव व शेतकऱ्याला झालेला फायदे'' या विषयावर मार्गदर्शन करतील.

### समारोप समारंभ व पुरस्कार वितरण :-

याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता समारोप समारंभ होत असून पुणे येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ संपन्न होणार असून यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती नाखले व महारष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र कला साहित्य प्रसरिणी मंडळ पुणेचे अध्यक्ष सचिन ईटकर यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न होईल. याच समारंभात मराठवाड्यातील कृषी, साहित्य, संगीत व युवा (युवा गौरव - साहित्य) या क्षेत्रातील चार गुणवंतांचा यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने पुरस्कार देण्यातज येणार असून त्यात जालना येथील प्रयोगशील शेतकरी, शेतकऱ्यांचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान, कृषीभूषण विजयआण्णा बोराडे यांना कृषी, छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ लेखक, साकेत प्रकाशन संस्थेचे प्रकाशक बाबा भांड यांना साहित्य, मूळ तेर ढोकीचे सध्या मुंबईत वास्तव्यास असलेले पद्मश्री पं. सतीश व्यास यांना संगीत तर तुळजापूर येथील साहित्य अकादमी युवा साहित्य पुरस्कार प्राप्त देविदास सौदागर यांना युवागौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरुप स्मृतीचिन्ह,रोख अकरा हजार रूपये, शाल, पुष्पहार असे आहे.


### संगीत सभेत संतूर वादन व शास्त्रीय गायन

रात्री ठिक ८.३० वा. शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत स्व. पं. शिवकुमार शर्मा यांचे शिष्य पद्मश्री पं. सतीश व्यास यांचे संतूर वादन होईल होईल त्यांना तबल्यावर पं. आदित्य कल्याणपूर हे साथ करतील. त्यानंतर कोलकत्ता येथील प्रतिभावान शास्त्रीय संगीत गायक उस्ताद अर्शद अली खान यांचे गायन होईल. त्यांना पुणे येथील प्रसिद्ध तबलावादक प्रशांत पांडव व संवादिनीवर गंगाधर शिंदे पुणे हे साथ करतील.

### कला दालन व ग्रंथ प्रदर्शन :-

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रंथ प्रदर्शन व विक्री, चित्र व फोटो प्रदर्शन आयोजित केले आहे. अंबाजोगाई येथील हौशी छायाचीत्रकर डॉ. शुभदा लोहिया, प्रा. अभिजीत लोहिया, डॉ. अविनाश मुंडे, शंतनु सोमवंशी, सुशांत सोमवंशी, मुन्ना सोमाणी व नीरज गौड यांच्या अंबाजोगाई परिसरातील पक्षी, फुलपाखरे यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन "विहंगम भोवताल" याचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. अंबाजोगाई येथील ज्येष्ठ चित्रकार त्र्यंबक पोखरकर यांनी रंग न वापरता तनाच्या काड्यापासून तयार केलेल्या चित्रांचे प्रदर्शन, आनंदवन येथील कला शिक्षक प्रल्हाद ठक हे वेगवेगळ्या धान्यापासून यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेची धान्य रांगोळी काढणार आहेत व स्वरक्तातून काढलेल्या देश पातळीवरील थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रपुरुष, समाजसेवक यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात येईल. तसेच यशवंत परिवारातील कला शिक्षकांचे चित्र प्रश्न भरवण्यात येईल. वेगवेगळे ग्रंथ प्रकाशनांचे ग्रंथप्रदर्शन व विक्री उपलब्ध असणार आहे. हे सर्व प्रदर्शने तिन्ही दिवस रसिक व प्रेक्षकांना पाहता येतील. कै.भगवानरावजी लोमटे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या समारोहाचे महाराष्ट्रभर कौतुक झालेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलेल्या या समारोहास रसिक श्रोत्यांनी तिन्ही दिवस उपस्थित राहुन सहकार्य करावे व कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष प्राचार्य कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा.सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतिश लोमटे, सदस्य, प्राचार्य प्रकाश प्रयाग, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, प्रा.भगवान शिंदे, यांनी व इतर पदाधिकारी तसेच सल्लागार भगवानराव शिंदे बप्पा व राजपाल लोमटे यांनी केले आहे.

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग



भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे दोन वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**



# निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद बंद करायला सांगितल्यानंतर हितेंद्र ठाकूर झाले आक्रमक

**विरार (सतीश सोनावणे ) :** विरारमध्ये बहुजन विकास आघाडी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला. पैसे वाटप केल्याच्या आरोपावरून बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी भाजपचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांना घेरलं. या संपूर्ण प्रकारानंतर हितेंद्र ठाकूर आणि विनोद तावडे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत हितेंद्र ठाकूर यांनी विनोद तावडेंवर गंभीर आरोप केले. ही परिषद घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांना बंद करण्यास सांगितली. यावरून हितेंद्र ठाकूर यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

'पत्रकार परिषद घेऊ नका. असं कोणत्या कायदा आणि नियमात आहे. मी कुणाच्या बापाचं प्रेशर घेत नाही. वेगवेगळ्या रुममध्ये पैसे मिळाले आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांना विचारा. मला सुरक्षा दल आणि कुणाला जुमानत नाही. पण पोलीस आणि निवडणूक आयोगावर दबाव आहे. विनोद तावडे येथे थांबले कसे? असा सवाल हितेंद्र ठाकूर यांनी केला.

## पान १ वरून...

### ▶▶| पत्रकारांना 'गुलाम' म्हणणाऱ्या राहुल ...

ते त्यांच्या मालकांच्या विरोधात काम करू शकत नाहीत. एक प्रकारे ते गुलामच आहेत' असे काही माध्यमांनी वृत्त दिले आहे. या वृत्तांचा आधार घेत मुंबई प्रेस क्लबने निषेध व्यक्त केला आहे.

### ▶▶| दिल्लीत प्रदूषणाची पातळी वाढली; राज्य...

त्याअंतर्गत कारखाने, बांधकामे, वाहतुकीवर कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. दरम्यान दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी केंद्र सरकारकडे एक महत्वाची मागणी केली आहे. तसेच त्यांनी एक महत्वाची बैठक देखील बोलावली आहे.

दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय म्हणाले, "दिल्ली सरकारने प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडे कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी परवानगी मागितली आहे. मात्र वारंवार मागणी करूनही केंद्र सरकारने कोणतीही कारवाई केलेली नाही."याबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे मागणी करणार असल्याचे राय म्हणाले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील या प्रकरणात स्वतः लक्ष घालावे, अशी मागणी गोपाल राय यांनी केली आहे.

दाट धुक्यामुळे सोमवारी दिल्लीतील रेल्वे आणि विमान वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. त्यामुळे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील दृश्यमानता कमी झाली. धुक्यामुळे दिल्ली विमानतळावर सकाळी ८.३० वाजेपर्यंत ११८ निर्गमन आणि ४३ आगमन अशा १६० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली. निर्गमनांना सरासरी २२ मिनिटे उशीर झाला आणि सकाळी सात उड्डाणे रद्द करण्यात आली. दिल्लीतील सरकारी कार्यालयांच्या वेळा बदलल्या आहेत. आदेशानुसार, जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारे किंवा स्वच्छ इंधन (एलएनजी/सीएनजी/बीएस-VI डिझेल/इलेक्ट्रिक) वगळता कोणत्याही ट्रकला दिल्लीत प्रवेश दिला जाणार नाही. इलेक्ट्रिक वाहने, सीएनजी वाहने आणि बीएस-VI डिझेल वाहने वगळता दिल्लीबाहेर नोंदणीकृत हलकी व्यावसायिक वाहने देखील बंदी अंतर्गत असतील. महामार्ग, रस्ते, उड्डाणपूल आणि इतर सार्वजनिक प्रकल्पांसह सर्व बांधकाम उपक्रमांवर तात्पुरती बंदी असेल.

### ▶▶| "मला गोळ्या झाडा, मी मरणार नाही, ...

यातील एकाने गाडीच्या काचेवर दगडफेक केली. यानंतर एक मोठा दगड देशमुख यांच्या कपाळाला लागला. यात रक्तस्राव झाल्याने देशमुख यांची प्रकृती बिघडली. लगेच त्यांना उपचारासाठी काटोल येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहे. अनिल देशमुख यांना नागपूर येथील मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच काटोल येथील ग्रामीण रुग्णालयाबाहेर राष्ट्रवादी शरद पवार गट आणि महाविकास आघाडीच्या स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. देशमुख यांच्यावरील हल्ल्याची माहिती मिळताच काटोल पोलिसांचा ताफाही ग्रामीण रुग्णालयात दाखल झाला. या ठिकाणी निर्माण झालेली तणावाची परिस्थिती पाहता मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मंगळवारी देशमुख यांना रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.

### अपक्षांसह विविध १५८ पक्षांचे ४ हजार...

तर जवळपास पाच पक्षांनी १००हून अधिक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले असून त्यात भारतीय जनता पक्ष, बहुजन समाज पक्ष, अखिल भारतीय काँग्रेस पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि वंचित बहुजन आघाडी या पक्षांचा समावेश असल्याचे निवडणूक आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

आगामी निवडणुकीत यंदा एकूण ४ हजार १३६ उमेदवारांचे अर्ज सादर करण्यात आले आहे. त्यात सर्वाधिक अर्ज हे अपक्ष उमेदवारांनी भरले असून हा आकडा २ हजार ८०६ इतकी आहे. या संपूर्ण यादीत एकूण १५८ राजकीय पक्षांचा समावेश आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## पालघर जिल्हा परिषदेत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती साजरी



**पालघर (सुचिता देशमुख)-** आज दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.तसेच राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा यावेळी घेण्यात आली. इंदिरा प्रियदर्शिनी गांधी या भारतीय राजकारणाच्या इतिहासातील एक उल्लेखनीय महिला, आयर्न लेडी, भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या आयकॉन होत्या. इंदिरा गांधींचे वडील, जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्याच्या लढ्यात महात्मा गांधींना पाठिंबा देणारे भारताचे पहिले पंतप्रधान होते. इंदिरा गांधी या जास्त काळ सेवा करणाऱ्या दुसऱ्या पंतप्रधान होत्या, पहिल्या १९६६ ते १९७७ आणि दुसऱ्या १९८० ते १९८४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. १९४७ ते १९६४ या काळात त्या जवाहरलाल नेहरू प्रशासनात चीफ ऑफ स्टाफ म्हणून कार्यरत होत्या. अत्यंत समाकलित. १९५९ मध्ये त्या काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडून आल्या. अशा थोर महिलेची आज जयंती साजरी करण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य चंद्रशेखर जगताप, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला बाल विकास प्रवीण भावसार, उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक MREGS अतुल पारस्कर, शिक्षणाधिकारी माध्यमिक संगीता भागवत तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी टीएमटीच्या १७३ बसेस



**ठाणे (रोहित जैसवार) :** बुधवार, २० नोव्हेंबर रोजी होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेने (टीएमटी) बस व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. या कर्मचाऱ्यांसाठी १७३ बसगाड्या देण्यात आल्या. मंगळवारी या कर्मचाऱ्यांना त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी जाता यावे यासाठी ठाणे रेल्वे स्थानक पश्चिम - सॅटीस येथून सकाळी सहा ते नऊ या वेळेत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. सॅटीस ते होरायझन शाळा, सॅटीस ते वागळे इस्टेट-आयटीआय आणि सॅटीस ते बेथनी हॉस्पिटल या मार्गावर ही सेवा देण्यात आली. तर, बुधवारी, रात्री मतदान प्रक्रिया पूर्ण करून ठाणे स्टेशनवर पोहोचण्यासाठीही बस सेवा देण्यात येणार आहे. ही सेवा रा. ८ ते मध्य रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहील. होरायझन शाळा, वागळे इस्टेट-आयटीआय आणि बेथनी हॉस्पिटल येथून ठाणे रेल्वे स्थानक पश्चिम या मार्गावर ही सेवा उपलब्ध असेल, असे परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी सांगितले.

**नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा!**

दरम्यान, ठाणे महापालिका क्षेत्रात नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा. मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

**सर्वंकष स्वच्छता मोहीम**

मतदानाच्या पार्श्वभूमीवर, ठाणे महापालिका क्षेत्रात, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार १६ ते १८ नोव्हेंबर या काळात मतदान केंद्र आणि परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मतदान केंद्र, त्याचा सभोवतीचा १०० मीटरचा परिसर स्वच्छ करण्यावर या मोहिमेत भर देण्यात आला. घनकचरा व्यवस्थापन विभाग, स्थानिक प्रभाग समिती आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समन्वयाने एकूण ३६७ ठिकाणी असलेल्या १५२८ मतदान केंद्रांवर ही मोहीम राबविण्यात आली. त्यासाठी १३९० कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आल्याची माहिती उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) मनीष जोशी यांनी दिली.

# अनंताच्या दिशेने विस्ताराचा संदेश प्रसारित करुन ७७व्या निरंकारी संत समागमामी यशस्वी सांगता मुंबई महाराष्ट्रातील निरंकारी भक्तगण परतले







**कल्याण (गणेश बागडे) :** 'विस्तार – अनंताच्या दिशेने' या मुख्य विषयावर आधारित तीन दिवसीय ७७ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची सोमवारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वचनांद्वारे यशस्वीरित्या सांगता झाली. मुंबई व महाराष्ट्रातून समागमामध्ये सहभागी झालेले सुमारे एक लाख भाविक भक्तगण समागमाचा भरपूर आनंद प्राप्त करुन आपापल्या निवासस्थानी परतू लागले आहेत. समालखा (हरियाणा) येथे निरंकारी आध्यात्मिक स्थळाच्या सुमारे ६५० एकरांच्या विशाल मैदानावर आयोजित या समागमामध्ये देश-विदेशातील लाखो भाविक-भक्तगण सहभागी झाले होते.

समागमाच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सायंकाळी उपस्थित विशाल मानव परिवाराला संबोधित करताना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, की जगामध्ये आपण जेवढ्या वस्तू किंवा पदार्थ पाहत व अनुभवत आहोत त्या सर्व परिवर्तनशील आहेत. त्यापैकी कोणत्याही गोष्टीला शाश्वत सत्य मानले जाऊ शकत नाही. जसे सूर्य मावळतो तेव्हा रात्र होते आणि रात्र सरली की पुन्हा सूर्योदय होतो. बालक म्हणून जन्माला आलेला मनुष्य हळू हळू शरीराच्या आकारात बदल घडून वृद्धत्वाकडे झुकतो. अशा तऱ्हेने प्रकृतीच्या कोणत्याही वस्तूचे अस्तित्व शाश्वत मानणे हा आपला भ्रम आहे. कारण सत्य केवळ एक निराकार परमात्मा आहे ज्याला विविध नावांनी पुकारले जाते. या सदोदित एकरस व अविनाशी परम सत्याला जाणून आपण भ्रमांपासून मुक्ती प्राप्त करु शकतो. तत्पूर्वी, निरंकारी राजपिता रमितजी यांनी आपल्या विचारांमध्ये सांगितले, की ७७व्या समागमामध्ये भाग घेणे ही भाविक भक्तगणांसाठी एक अनोखी पर्वणी आहे. हा समागम जीवनाला सखोलता आणि विस्तार प्रदान करत आहे. सद्गुरुंच्या शिकवणूकीने मानवी अस्तित्वाला असीम आणि गौरवशाली केले आहे. भक्ती केवळ साधन नसून साध्यही आहे. सतगुरुंकडून प्रदत्त आध्यात्मिकता आमचे विचार, आमची दृष्टि, आमचे प्रेम, सेवा, समर्पण, करूणा व अन्य दिव्य गुणांचा विस्तार करते.

संत समागमाच्या तिसऱ्या दिवसाचे मुख्य आकर्षण होते एक बहुभाषी कवी दरबार ज्यामध्ये देशविदेशातून आलेल्या जवळपास १९ कविंनी 'विस्तार – अनंताच्या दिशेने' या विषयावर आधारित हिंदी, पंजाबी, मुलतानी, हरियाणवी व इंग्रजी भाषांमध्ये आपल्या प्रेरणादायी काव्य रचना सादर केल्या ज्याची उपस्थित श्रोत्यांनी खूप प्रशंसा केली. यावर्षीचा समागमाचा मुख्य विषय 'विस्तार-अनंताच्या दिशेने' यावर आधारित निरंकारी प्रदर्शनी समस्त भाविक भक्तगणांसाठी आकर्षणाचे केंद्र बनून राहिली. प्रतिवर्षाप्रमाणे समागमामध्ये सर्वांसाठी मोफत लंगरची व्यवस्था समागमाच्या चारही मैदानांवर करण्यात आली होती. त्यामध्ये विविध सांस्कृतिक व धार्मिक पार्श्वभूमीतून आलेले भक्तगण एकत्र बसून कोणत्याही भेदभावाविना महाप्रसाद ग्रहण करत होते ज्यातून 'सारा संसार - एक परिवार'चे मनमोहक दृश्य परिलक्षीत होत होते.

७७व्या निरंकारी संत समागमात कैरोप्रॅक्टिक तंत्राद्वारा द्वारे निःशुल्क स्वास्थ्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यत: या तंत्राने पाठीच्या कण्याच्या दुखण्यांवर इलाज केला जातो. या शिबिरात दररोज सुमारे तीन ते चार हजार भक्तगण उपचार घेत होते. अमेरिका, यूनाईटेड किंगडम, कॅनडा, स्पेन, फ्रान्स व भारत या देशांतील सुमारे २५ डॉक्टरांची टीम डॉ.जिम्मी नंदा यांच्या नेतृत्वाखाली समागम ग्राउंडवर आपल्या सेवा देत होते.

या व्यतिरिक्त समागम स्थळावर एक १०० बेडचे तात्पुरते हॉस्पिटल उभारण्यात आले होते ज्यामध्ये आयसीयूची व्यवस्थादेखील करण्यात आली होती. शिवाय होमियोपॅथी व फिजियोथेरपीचीही व्यवस्था करण्यात आली होती.

## अंध मतदारांच्या सोयीसाठी ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी प्रत्यक्ष घरी जावून वाटप




**ठाणे (यश सावंत) -** विधानसभा निवडणुकीसाठी अंध मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रेल लिपीमध्ये मतदार माहिती चिठ्ठी प्रत्यक्ष अंध मतदारांच्या निवासस्थानी जाऊन वाटप करण्यात आली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता जास्तीत जास्त मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.या अंतर्गत ठाणे शहरातील जास्तीत जास्त अंध मतदारांना त्यांचा हक्क बजावण्यात सुलभता व्हावी, यासाठी ब्रेल लिपीमध्ये माहिती दस्तऐवज तसेच चिठ्ठी अंध मतदारांना देण्यात आली.

अंध मतदारांना मतदान केंद्रावर मतदान करता यावे यासाठी सोयीसुविधा करण्यात आल्या आहेत.सुलभ मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी देण्यात आली. लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवाहन अंध मतदारांना करण्यात आले. अंध मतदारांच्या सोयीसाठी ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी प्रत्यक्ष घरी भेटल्यामुळे सर्व अंध मतदारांनी 148 ठाणे विधानसभा मतदारसंघ प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## डोंबिवलीत गावठी मद्य विक्रेत्यांवर पोलिसांच्या धाडी

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** विधानसभा निवडणुकीतील मतदानाच्या पूर्वसंध्येला सर्व प्रकारच्या मद्य विक्रीला शासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे अधिकृत परवानाधारी मद्य विक्रीची दुकाने बंद आहेत. अनेक मद्यपींनी गावठी मद्याच्या अड्ड्यांवर धाव घेतली आहे. असे अड्डे शोधून आणि प्राप्त तक्रारीप्रमाणे पोलिसांनी येथील मोठागाव, २७ गावांमधील कोळेगाव येथील गावठी, देशी मद्याच्या अड्ड्यावर धाड टाकून मद्य साठा जप्त केला आहे. तसेच तीन मद्य विक्रेत्यांवर मानपाडा, विष्णुनगर पोलीस ठाण्यात कल्याण गुन्हे शाखेचे, स्थानिक पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. निवडणुकीच्या काळात झोपडपट्टी भागातील मतदारांना मद्याचे आमिष काही पक्षीय उमेदवारांच्या समर्थकांकडून दाखविले जाते. त्यामुळे पोलिसांनी रात्रीच्या वेळेतील गस्त वाढविली आहे. ड्रोनव्दारे परिसराची टेहळणी केली जात आहे. डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव टेकडी भागात शिवमंदिराच्या बाजुला झाडाखाली एक व्यक्ति गावठी दारू विकत असल्याची माहिती कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांना शनिवारी मिळाली. तातडीने साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, हवालदार यु. जी. खंदारे, महाजन घटनास्थळी रवाना झाले. तेथे पिन्टु तुकाराम भोईर हे एका ड्रममध्ये १५ लीटर गावठी (हातभट्टी) लीटर दारू घेऊन विक्रीसाठी बसले होते.

## डोळ्यांविषयी जनजागृती करून डॉ. श्रीधर ठाकूर यांचा वाढदिवस साजरा.. ६६ विद्यार्थ्यांनी घेतला चित्रकला स्पर्धेत सहभाग..!



**मुरबाड (आकाश कांबळे) -** जागतिक बालदिनाचे अवचित साधून व इन्फिगो आय केअर हॉस्पिटल चे व्यवस्थापकीय संचालक डॉ.श्रीधर ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आज इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या वतीने मुरबाड तालुक्यातील इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या चित्रकला स्पर्धेत डोळ्यांविषयी जनजागृती करण्याचे चित्र रेखाटन विषय ठेवण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेत संपूर्ण तालुक्यातून ६६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट प्रतिसाद दिला. या चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.मानस मुके, द्वितीय क्रमांक हेमांगी जाधव, तृतीय क्रमांक आयुष अगिवले या तीन विजेता स्पर्धकास सन्मानचिन्ह व सन्मानपत्र व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकास सन्मानपत्र देण्यात आले स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी डॉ. श्रीधर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. चित्रकलेचे स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल विद्यार्थ्यांच्या पालकांनी हॉस्पिटल प्रशासनाच्या कौतुक करून शुभेच्छा दिल्या.. या स्पर्धेचे आयोजन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या वतीने करण्यात आले होते ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हॉस्पिटलच्या सर्वात कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व पालकांचे हॉस्पिटलचे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी आभार प्रदर्शन केले.

# नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे -जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे

## ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील ६ हजार ९५५ मतदान केंद्रे मतदानासाठी सज्ज

**ठाणे (विशाल पाटील) :** बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ ची मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या मतदान प्रक्रियेसाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून आज ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी यंत्रणा रवाना झाली आहे. तरी नागरिकांनी दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यत मतदान करुन आपला लोकशाहीचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

आज १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदानकेंद्रावर लागणाऱ्या साहित्याचे वाटप मतदान केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांना करण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात एकूण ६ हजार ८९४ ही मूळ मतदान केंद्रे व ६१ सहायकारी मतदान केंद्रे अशी एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून या मतदान केंद्रांवर एकूण ८ हजार २७३ बॅलेट युनिट, ८ हजार २७३ कंट्रोल युनिट तर ८ हजार ९६२ व्हीव्हीपॅट रवाना झाले आहे. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी, एक शिपाई व पोलीस कर्मचारी असे पथक मतदानाच्या दिवशी कार्यरत असणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ६ हजार ९५५ मतदान केंद्रावर एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी १-७ हजार ७१७, इतर



मतदान अधिकारी - १५ हजार ४३४ अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात सखी, दिव्यांग व युवा ही तीन नाविन्यपूर्ण मतदान केंद्र असून ही सर्व मतदान केंद्रे सज्ज झाली आहे. सर्व केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष हे सर्व सामान घेवून पोहचले असून मतदानाच्या दिवशी सकाळी ६.०० वा. मॉकपॉल घेवून ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, बॅलेट युनिट ही सर्व यंत्रे सुरळीत चालत असल्याची खात्री करुन घेतली जाणार आहे. त्यानंतर सर्व मशीन्स क्लीअर करुन सकाळी ७.०० वा. मतदान प्रक्रियेस सुरूवात होणार आहे. मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा देखील सज्ज झाली असून सर्व मतदान केंद्रावर पोलीस कर्मचारीही हजर झाले आहेत.

जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील एकूण ६ हजार ९५५ पैकी महापालिका हद्दीतील ५ हजार ८२१ तर ग्रामीण भागातील ७१४ मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा असणार आहे. तसेच मतदारांसाठी रांगेमध्ये खुर्च्यांची व्यवस्था, ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरची सुविधा, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.

एकूणच मतदान प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली असून मतदान केंद्रावर सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# शर्वरी जोग नव्या मालिकेत झळकणार, अभिनेत्रीच्या खऱ्या आयुष्यातील 'मितवा' कोण माहितीये का?



स्टार प्रवाह वाहिनीवर लवकरच नवी मालिका सुरु होत आहे. 'तू ही रे माझा मितवा' असं मालिकेटं टायटल आहे. यामध्ये अभिनेत्री शर्वरी जोग आणि अभिनेता अभिजीत आमकर मुख्य भूमिकेत आहेत. या दोघांची फ्रेश जोडी प्रेक्षकांसमोर येत आहे. शर्वरी जोग 'कुन्या राजाची तू गं रानी' मालिकेत मुख्य भूमिकेत होती. त्यामुळे तिचे आधीपासूनच अनेक चाहते आहेत. पण तुम्हाला माहितीये का शर्वरी जोगचा खऱ्या आयुष्यातला 'मितवा' कोण आहे?

शर्वरी जोग आतापर्यंत अनेक मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. 'जीव झाला येडापिसा' मालिकेतही ती होती. तर कुन्या राजाची तू गं रानी' मालिकेत तिने मुख्य भूमिका साकारली. तिच्या अभिनयाचे अनेक जण चाहते आहेत. त्यामुळे तिच्या आगामी मालिकेसाठी चाहते उत्सुक आहेत. तर तिच्यासोबत झळकणारा अभिनेता अभिजीत आमकरने याआधी 'एक सांगायचंय' 'टकाटक' या सिनेमांमध्ये काम केलं आहे. आता 'तू ही रे माझा मितवा' मध्ये शर्वरी आणि अभिजीतची केमिस्ट्री पाहण्यासाठी चाहते आतुर आहेत.

दरम्यान शर्वरी जोग खऱ्या आयुष्यात कोणाला डेट करतेय हे समोर आले आहे. शर्वरीचा बॉयफ्रेंडही अभिनेताच आहे. त्याचं नाव आहे गौरव मालकणकर. 'पिरतीचा वणवा उरी पेटला' मालिकेत त्याने खलनायकाची भूमिका साकारली. 'फुलपाखरु' मालिकेतून तो घराघरात पोहोचला होता. शिवाय त्याने 'फुलराणी', 'धर्मवीर २' या सिनेमांमध्येही काम केले आहे.

शर्वरी आणि गौरव गेल्या काही वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. तसंच त्यांनी सोशल मीडियावर या नात्याची कबूलीही दिली आहे. दोघंही अनेकदा एकमेकांसोबत फोटो अपलोड करत असतात आणि एकमेकांवरचं प्रेमही व्यक्त करतात.

## आई तुळजाभवानीच्या देवत्वाचा प्रत्यय अनुभवायला मिळणार




मराठी प्रेक्षकांसाठी मालिका म्हणजे अगदी जिव्हाळ्याचा विषय. या मालिकांची मेजवानी देणाऱ्या अनेक मराठी वाहिन्या सध्या उपलब्ध आहेत. त्यापैकीच एक म्हणजे कलर्स मराठी वाहिनी. कलर्स मराठी ही वाहिनी नेहमीच प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. याच वाहिनीवर सुरू असलेल्या 'आई तुळजाभवानी'च्या पौराणिक गाथेत आज एक नवा अध्याय उलगडणार आहे. देवीने मडक्यात बंदिस्त केलेले दैवत्व, चुकीच्या हाती जाऊन विध्वंस होऊ नये म्हणून ब्रह्मदेव आणि विष्णुदेव यांच्या विनंतीवरून तुळजाने ते परत स्वीकारले आणि अष्टभुजेस्वरूप धारण केले. मात्र, या प्रवासात देवीने स्पर्श केलेला पाषाण प्रकाशमान होतो आणि पुढे तो चिंतामणी पाषाण म्हणून ओळखला जातो. या पाषाणाचा अगाध महिमा आणि त्याचे रहस्य आज प्रेक्षकांना समजणार आहे. याआधी सधवा आणि विधवा हा सनातन सुरू असलेला वादाचा मुद्दा आई तुळजाभवानीने खूप सोप्या शब्दांत सोदाहरण समजावून सांगितला. तसेच देवीने स्त्रीत्वाच्या सन्मानाचा मुद्दा भक्तांसमोर मांडला. जो प्रत्येक स्त्रीला बळ देणारा ठरला. 'आई तुळजाभवानी' मालिकेत या आठवड्यात दैवत्वाचा प्रवास आणि चिंतामणी पाषाणाचा अनमोल ठेवा अनुभवता येणार आहे. पाहा चिंतामणी पाषाणाचा अगाध महिमा २० नोव्हेंबरपासून रात्री ९ वाजता 'आई तुळजाभवानी' मालिकेत.

चिंतामणी पाषाण हा हिंदू धर्मातील श्रद्धेचा आणि भक्तीचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. चिंतामणी म्हणजे चिंता दूर करणारा, मनातील इच्छा पूर्ण करणारा पाषाण. हा पाषाण देवी तुळजाभवानीच्या कथा आणि दैवी चमत्कारांशी जोडला गेलेला आहे. चिंतामणी पाषाणाला दैवी ऊर्जा आणि देवीची उपस्थिती दर्शवणारे मानले जाते. त्याला स्पर्श करून मनोकामना व्यक्त केल्यास ती पूर्ण होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. चिंतामणी हा केवळ पाषाण नाही, तर तो विश्वास, श्रद्धा आणि भक्तीचा आधार आहे. देवी तुळजाभवानीची कृपा आणि तिच्या दैवी स्वरूपाचे ते प्रतीक मानले जाते. देवी भक्तांसाठी अत्यंत श्रद्धेचा हा कथाभाग असल्यामुळे प्रेक्षकांमध्ये त्याची विशेष उत्सुकता आहे.

आई तुळजाभवानीच्या अश्या असंख्य लीला आणि दैवी चमत्कार या मालिकेत पाहायला मिळत आहेत.

## सर्वोत्कृष्ट चित्रपटांच्या नामांकनात 'जिप्सी' हा मराठी चित्रपट




गोव्यात होत असलेल्या यंदाच्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये (इफ्फी) यंदापासून पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी सात चित्रपट स्पर्धेत असून पुरस्काराच्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय चित्रपटांना शशि चंद्रकांत खंदारे यांनी दिग्दर्शित केलेला 'जिप्सी' हा चित्रपटही टक्कर देणार आहे. 'इफ्फी' हा केंद्र सरकारचा अधिकृत चित्रपट महोत्सव आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या महोत्सवाला विशेष प्रतिष्ठा आहे. यंदा या महोत्सवाचे 55वे वर्ष आहे. या पार्श्वभूमीवर, यंदापासून महोत्सवात पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यासाठी नामांकने जाहीर करण्यात आली आहेत. त्यात पाच आंतरराष्ट्रीय आणि दोन भारतीय दिग्दर्शकांचे चित्रपटांचा समावेश आहे. या विभागातील विजेत्याला मानाचा रौप्य मयूर, १० लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे.भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली सिंगापुरचे दिग्दर्शक आणि पटकथाकार अँथनी चेन, अमेरिकन-ब्रिटीश चित्रपट निर्मात्या एलिझाबेथ कार्लसन, स्पॅनिश निर्माते फ्रान बोर्गिया तसेच ऑस्ट्रेलियाचे संकलक जिल बिलकॉक या ख्यातनाम मान्यवरांचे परीक्षक मंडळ विजेत्याची निवड करणार आहे.

विशेष म्हणजे, या स्पर्धेसाठी नामांकन मिळालेला 'जिप्सी' हा एकमेव मराठी चित्रपट आहे. 'बोलपट निर्मिती' या निर्मिती संस्थेने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या पूर्वी राज्य शासनाने प्रतिष्ठेच्या कान महोत्सवात पाठवलेल्या तीन मराठी चित्रपटांमध्येही 'जिप्सी' या चित्रपटाचाही समावेश होता. त्यामुळे कान महोत्सवा पाठोपाठ इफ्फीसारख्या मोठ्या महोत्सवाचा मान 'जिप्सी' चित्रपटाला मिळाला आहे.

## मतदान केल्याची शाई दाखवा अन् ५० टक्के सूट मिळवा, 'या' लोकप्रिय मराठी नाटकाची ऑफर

**सध्या देशात विधानसभा निवडणुकी रणधुमाळी सुरु आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. या निवडणूकीत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी निवडणूक आयोग तसेच स्थानिक प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. जास्तीत जास्त लोकांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी 'पाहिले न मी तुला' या नाटकाच्या निर्मात्यांनी खास ऑफर आणली आहे.**





'पाहिले न मी तुला' या नाटकाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. या नाटकाचा रौप्य महोत्सवी प्रयोग आणि मतदानाचा दिवस असा योग जुळून आला आहे. त्यामुळे नाट्यरसिकांसाठी एक जबरदस्त ऑफर 'पाहिले न मी तुला' या नाटकाने आणली आहे. या ऑफर अंतर्गत, मतदान केल्यानंतर, लोक बोटावर शाई दाखवून 'पाहिले न मी तुला' या नाटकाच्या तिकिटावर ५० टक्क्यांपर्यंत सूट मिळवू शकतील. या नाटकाचा रौप्य महोत्सवी प्रयोग येत्या २० नोव्हेंबर रोजी दादरमधील शिवाजी मंदिर येथे दुपारी ४जता रंगणार आहे. सवलत फक्त तिकीट बारीवर उपलब्ध असणार आहे. ऑनलाइन नसणार आहे. 'सुमुख चित्र' आणि 'अनामिका' प्रस्तुत 'पाहिले न मी तुला' या नाटकाच्या रौप्य महोत्सवी प्रयोगाचा आनंद घेत मतदानाचा हक्क बजवा, असे आवाहन या नाटकात प्रमुख भूमिकेत असणाऱ्या अंशुमन विचारे (Anshuman Vichar), हेमंत पाटील (Hemant Patil) , सुवेधा देसाई यांनी केले आहे. मतदानाची टक्केवारी घसरत असल्याचं चित्र पाहायला मिळतेय. त्यामुळं मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विविध प्रयोग केले जात आहेत. यातीलच एक प्रयोग हा आहे. दरम्यान, २० नोव्हेंबर रोजी मतदान झाल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तर त्याच दिवशी निकाल लागणार आहे. त्यानंतर काही दिवसातच राज्यात नवीन सरकार स्थापन होणार आहे.

## 'गुलकंद' हा नवा चित्रपट या दिवशी होणार प्रदर्शित




एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत, वेलक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित 'गुलकंद' हा मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणारा चित्रपट नवीन वर्षात १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल माडियाद्वारे घोषणा करण्यात आली आहे. सचिन मोटे लिखित, सचिन गोस्वामी दिग्दर्शित या चित्रपटात फॅमिली एंटरटेनमेंट आणि कॉमेडीचे अनोखे कॉम्बिनेशन पाहायला मिळणार आहे. यामध्ये सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, शार्विल आगटे अशी तगडी स्टारकास्ट असणार आहे. 'गुलकंद'चे सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया निर्माते आहेत.

चित्रपटाचे नाव, भन्नाट टीम यामुळे प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, निर्माते सचिन गोस्वामी म्हणतात, ''या सगळयांसोबत मी आधी काम केलं असल्याने आमच्यात एक बॉण्डिंग आहे आणि आमची हिच केमिस्ट्री यातही प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट एक फॅमिली एंटरटेनर असून प्रेक्षकांना या मुरलेल्या गुलकंदाची चव चाखायला नक्कीच आवडेल. ही एक अशी कथा आहे, ज्याची लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच मजा घेऊ शकतात. ही अतिशय हृदयस्पर्शी कहाणी आहे.''

# उभं राहून पाणी प्यायल्याने गुडघे दुखतात?



हल्ली धावपळीच्या काळात आपल्याला सगळयाच गोष्टी वेगाने करण्याची सवय असते. भराभर यावरून कामासाठी निघणे, घाईत जेवण करणे, गटागट पाणी पिणे. आपण सर्वच गोष्टी धावत पळत आणि वेगाने करतो. मात्र हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय हानीकारक असते. दिवसातून किमान 8 ते 10 ग्लास पाणी पिण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. असे असले तरी मात्र, आपण पाणी कसे पितो हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. बहुतेक लोक उभे राहून पाणी पितात. काही लोक म्हणतात की, उभे राहून पाणी पिल्याने गुडघ्यांवर वाईट परिणाम होतो. आणि ते लवकर कमजोर होतात. खरंच अस होत का जाणून घेऊया.

उभं राहून पाणी प्यायल्याने काय होतं?

उभे राहून पाणी पिल्याने असा काही त्रास होतो हे सांगणारी कोणतीही रिसर्च आतापर्यंत समोर आलेली नाही. आपण जे काही खातो किंवा पितो ते सर्व आपल्या अन्ननलिकेद्वारे आपल्या पोटात जाते. त्यानंतर मग आपल्या आतड्यांपर्यंत पोहोचते आणि तिथे ते शोषले जाते. उभे राहून पाणी प्यायल्यामुळे निश्चितपणे काही समस्या उद्भवू शकतात. उभे राहून पाणी प्यायल्याने ते शरीरात लवकर शोषले जाते. जे सांध्यांसाठी अयोग्य आहे. दीर्घकाळ ही पद्धत केल्यास सांधेदुखीसारख्या समस्या उद्भवू शकतात.

उभे राहून पाणी प्यायल्यामुळे पाणी फिल्टर नव्हता पोटाच्या खालच्या भागात पोहोचते. ज्यामुळे किडनीवर दाब पडतो. यामुळे किडनीशी संबंधित आजार निर्माण होऊ शकतात. त्यामुळे उभे राहून पाणी पिऊ नये.

या गोष्टी लक्षात ठेवा

शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य प्रमाणात पाणी प्या. रोज 4 ते 5 लिटर पाणी पिणे आपल्या शरीरासाठी महत्त्वाचे आहे पाणी फार कमी किंवा फारच जास्त प्रमाणात पिऊ नये. हे दोन्ही आरोग्यासाठी हानिकारक आहेत.

पाणी नेहमी आरामात बसून प्यावे, घोट घोट करून प्यावे. जेवणाच्या अर्धा तास आधी आणि अर्धा तास नंतर पाणी पिणे चांगले. सकाळी रिकाम्या पोटी आणि रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास कोमट पाणी पिणे देखील आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

# हिवाळ्यात प्राण्यांची घ्यावी विशेष काळजी



हिवाळ्यातील गुलाबी थंडी अनेक आजार सोबत घेऊनच येते. त्यामुळे या ऋतुत आरोग्याची काळजी घ्यावी असा सल्ला डॉक्टर देतात. केवळ आपणच नाही तर घरातील पाळीव प्राण्यांची काळजी सुद्धा घेणे आवश्यक आहे. कारण हिवाळ्यात प्राणी आजारी पडण्याची शक्यता अधिक असते. असे म्हणतात की, कुत्रे आणि मांजरीच्या अंगावरील केस त्यांचे थंडीपासून संरक्षण करतात. पण, पूर्णपणे करू शकत नाही हेही आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे जाणून घेऊयात, हिवाळ्यात प्राण्यांची काळजी कशी घ्यावी.

**गरम पाण्याने आंघोळ –**

माणंसाप्रमाणेच प्राण्यानांही थंडी लागते. त्यामुळे प्राण्यांना आंघोळ घालताना थंड पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. पण, जास्तप्रमाणातही गरम पाणी वापरू नये नाहीतर त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. तुम्ही कोमट पाण्याने आंघोळ घालू शकता.

**उबदार जागा –**

घरातील पेट्स कुठेही झोपतात. अनेकदा तर फरशीवर झोपलेले आपण त्यांना पाहतो. पण, थंड फरशीवर झोपून पेट्स आजारी पडू शकतात. अशावेळी तुम्ही त्यांना उबदार बिछाना द्यायला हवा. यासह ब्लॅंकेटसुद्धा द्यायला हवेत.

**स्वेटर –**

थंडीत पेट्सना वॉकला नेताना स्वेटर किंवा लोकरीचे जॅकेट घालायला हवेत. या कपड्यांमुळे त्यांना थंडीचा त्रास होत नाही.

**औषधे –**

हिवाळ्यात प्राण्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे प्राण्यांच्या लसीकरणाकडे अवश्य द्यायला हवे. तसेच कोणतीही औषधे सुरू असतील तर त्यात खंड पडू देऊ नका.

**वॉकची वेळ –**

साधारण: पेट्सना वॉकला घेऊन जाताना सुर्यप्रकाश असेल याची खात्री बाळगा. सुर्यप्रकाशात व्हिटॅमिन D असते, ज्यामुळे हाडे निरोगी राहतात.

**पाणी –**

हिवाळ्यात हायड्रेट राहण्यासाठी वेळोवेळी त्यांना पाणी देत राहा. पाणी देताना थंड देऊ नये, त्याऐवजी कोमट पाणी द्यावे.




**मेष** – घरगुती वातावरण चांगले राहील. क्षुल्लक शंकांना मनात थारा देऊ नका. राहून गेलेले काम करता येईल. व्यवसायात जम बसवा.

**वृषभ** – कोणतेही काम करताना सावधगिरी बाळगा. नवीन कामे आपल्या अंगावर पडतील. तुमच्यातील प्रेमळपणा सर्वांना दिसून येईल.

**मिथुन** – मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. शक्यतो कोणत्याही वादविवादात सहभागी होऊ नका. अधिकाराचा योग्य वापर करावा.

**कर्क** – निराशाजनक विचारांना मनात थारा देऊ नका. कौटुंबिक वातावरणात रमून जाल. घरातील वृद्ध व्यक्तीसाठी धावपळ होईल.

**सिंह** – सामाजिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेऊन चालणार नाही. आपल्या कामातून समाधान शोधावे.

**कन्या** – नवीन मित्र जोडाल. परोपकाराची जाणीव ठेवून वागाल. भागीदाराशी मतभेद वाढवू नका. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**तूळ** – आपल्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल. कला क्षेत्रात मन रमेल. इच्छा नसताना प्रवास करावा लागू शकतो. धंद्यात दुर्लक्ष करू नका.

**वृश्चिक** – अडथळयातून मार्ग काढता येईल. जोडीदाराच्या मताचा आदर करावा. धंद्यातील समस्या कमी होईल. थकबाकी वसूल कराल.

**धनु** – तुमच्या कामाचे सर्वत्र कौतुक होईल. अतिसाहस करायला जाऊ नका. प्रेमाला चालना मिळेल. एखादा महत्त्वाचा निर्णय घेता येईल.

**मकर** – ज्ञानाचा सदुपयोग करता येईल. मनातील शंका काढून टाकाव्यात. फटकळपणे बोलणे टाळा. आर्थिक व्यवहारात सावध राहा.

**कुंभ** – आपल्या धंद्यात वाढ होईल. मागील येणे वसूल कराल. नातेवाईकांशी क्षुल्लक मतभेद वाढू शकतात. नवीन कामात लक्ष घालावे.

**मीन** – घरातील लोकांची नाराजी दूर करता येईल. जिद्दीने यश खेचता येईल. मनाची द्विधा अवस्था टाळावी. नातेवाईकांना मदत कराल.

# कचरा गोळा करण्यासाठी रात्रीही हवी याची सुविधा !



**पुणे (सुचिता देशमुख) :** 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' या प्रमाणे पुण्याच्या शेजारी असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिक देखील अनेकदा रात्रीच्या वेळी उशिरा कोणी नाही, हे पाहून सर्रासपणे रस्त्याच्या बाजूला, वर्दळ नसलेल्या ठिकाणी तसेच मोकळया आणि दुर्लक्षित जागेवर कचरा टाकतात.

रस्त्याच्या कडेला कचरा टाकणारे हे नागरिक सुशिक्षित असून अशा पद्धतीने रस्त्यावर कचरा टाकला जाऊ नये, असे आवाहन करूनही याकडे दुर्लक्ष केले जाते. दोन आठवड्यांपूर्वी 'लोकसत्ताने' याबाबतचे वृत्त प्रसिद्ध करत यावर आवाज उठविला होता. शहरातील अनेक भागांत नागरिकांकडून रस्त्यांवर हा कचरा गुपचूप टाकला जात असल्याचे आतापर्यंत केलेल्या पाहणीतून समोर आलेले आहे. यावर अनेक वाचकांनी 'लोकसत्ता'कडे पत्रव्यवहार करून ही कचरा समस्या सोडविण्यासाठी काय केले पाहिजे, याबाबत भूमिका मांडली आहे.

शहरातील विविध भागांतील कचरा हा घंटागाडीच्या माध्यमातून सकाळच्या वेळेत संकलित केला जातो. त्यामुळे रात्री उशिरा किंवा पहाटेच्या वेळी रस्त्याच्या कडेला तसेच मोकळया जागांवर तसेच रस्त्यावर फेकला जातो, ही वस्तुस्थिती आहे. 'लोकसत्ता'ने या विषयाला प्राधान्य देत त्याबद्दल अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.

शहरातील विविध भागांत तयार होणारा कचरा हा घंटागाडीच्या माध्यमातून गोळा केला जातो. दररोज सकाळच्या वेळेत हा कचरा गोळा केला जातो. त्यामुळे पहाटे फिरायला बाहेर पडलेले नागरिक आपल्याबरोबर कचरा आणत तो जागा मिळेल अशा कोणत्याही ठिकाणी फेकतात. यासाठी महापालिकेच्या घनकचरा विभागाने रात्री नऊनंतर कचरा गोळा करणारी घंटागाडी सुरू केली पाहिजे. तसेच कोणाकडे काही कारणास्तव जास्त प्रमाणात कचरा असल्यास त्यासाठी पालिकेने वेगळी स्वतंत्र गाडी पाठवावी. याासाठी काही प्रमाणात शुल्क घेण्यास कोणाचीही हरकत नाही. वारंवार असे दिसून आलेले आहे की, महापालिकेच्या घंटागाडीचे कर्मचारी कचरा संकलन व्यवस्थित आणि योग्य पद्धतीने करत नाही. तसेच अनेकदा कचरा गोळा करणाऱ्या गाडीमध्ये क्षमतेपेक्षा अधिकच भरला असतो.

कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने याकडे गांभीर्याने पाहत काही भागांत संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळेत कचरा गाडी पाठविली पाहिजे. गेले अनेक वर्षे हा प्रश्न सुटलेला नाही, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली पाहिजे. -जयदीप खरे, स्थानिक नागरिक

### जनजागृती करण्यात प्रशासन अपयशी

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकतेच पुण्यात आणि मुंबईला केलेल्या फटाक्यांच्या विविध प्रकारांच्या आवाजाची मोजणी केली. ही आकडेवारी १२५ डेसिबल्सपेक्षा जास्त आहे. मोठ्या आवाजाचे सुतळी बाँबसारखे फटाके तसेच लवंगीच्या माळा ध्वनिप्रदूषण वाढवितात असे दिसून आले. एकंदरीतच, फटाके उडविण्याचे मुलांचे आकर्षण कमी करण्यासाठी त्यांना फटाक्यांच्या आवाज व धुराचे दुष्परिणाम लहान वयातच समजावून सांगणे गरजेचे आहे. एखाद्या वर्षी शाळांमधून फटाके न उडवण्याची शपथ दिली जाते आणि नंतर ते मुलांबरोबर थोरांनाही त्याचा विसर पडतो. याशिवाय पर्यावरणपूरक फटाक्यांमध्येही असलेली बेरियम, सल्फर, कॉपरसारखी घातक रसायने खूप घनतेच्या रहिवासी क्षेत्रात आरोग्यावर विपरित परिणाम करू शकतात, असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे. फटाक्यांपासून नागरिकांना परावृत्त करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न कमी पडत आहेत असे वाटते.

SPORT

# Smriti Mandhana takes stunning diving catch in WBBL clash vs Scorchers



Smriti Mandhana took an absolute stunner in the outfield when Adelaide Strikers locked horns with Perth Scorchers in Match No.32 of the Women's Big Bash League (WBBL) 2024 at the Karen Rolton Oval in Adelaide. On Tuesday, November 19, the 28-year-old showed tremendous athleticism and helped the Strikers dismiss Carly Leeson when her team was in a dominant position.

In the first ball of the 15th over in the Scorchers' run-chase, Amanda-Jade Wellington took the wicket of Leeson, but it would not have been possible with Smriti's efforts. The leg-spinner bowled one outside the off-stump and Leeson tried to aerial with an inside-out shot over the covers.

But Leeson mistimed the ball and managed to spoon it in the air. Mandhana, standing at mid-off, kept her composure to take the catch with both hands. She went backwards, kept her eyes on the ball, pulled off a dive and made sure that she did not let go off the catch. It wasn't the only catch that Mandhana took against the Scorchers. In the fourth over, she took the catch of Beth Mooney, giving Zimbabwe's Anesu Mushangwe her first wicket. Thereafter, she helped Tahlia McGrath dismiss Mikayla Hinkley in the 14th over.

Apart from her incredible work as a fielder, Mandhana also had an excellent day with the bat in hand. After the Strikers were asked to bat first, the southpaw made 41 runs off 29 balls with five fours and a six. She was also involved in a partnership of 81 runs for the opening wicket off 9.4 overs.

After Mandhana got out to Sophie Devine, the Strikers went on to rack up a decent score of 169 for the loss of six wickets. Later, the Strikers won the match by 30 runs after restricting the Scorchers to 139 for the loss of eight wickets.

# My Retention Wasn't About...': Rishabh Pant Makes Stunning Revelation After Being Released By Delhi Capitals Ahead Of IPL 2025 Auction



Team India keeper-batter Rishabh Pant has opened up on Delhi Capitals not retaining him ahead of the IPL 2025 mega auction. Replying to a video uploaded by Star Sports on X as Sunil Gavaskar was discussing the Capitals' possibility of buying Pant back, the 26-year-old said his retention was certainly not about the money.

Pant was one of the three IPL captains along with Shreyas Iyer and KL Rahul to be released by the franchises ahead of the mega auction. The left-handed batter had marked his return to professional cricket in IPL 2024 and registered 446 runs in 13 matches at 40.55. He also kept a strike rate of 155.40.

In a video uploaded by Star Sports on X, Gavaskar claimed:

"When KKR won last year (IPL 2024), Shreyas Iyer was the captain. As I said earlier for Rishabh Pant as well, at times, there could be a disagreement on the fees. Delhi will want him because they will also need to find a captain if Rishabh Pant isn't in their team. So I feel Delhi will definitely try to use the RTM card or bring Rishabh Pant back into their team at the auction."

The southpaw replied to that clip and stated:

"My retention wasn't about the money for sure that I can say."

"Mitchell Starc's auction record is in danger" - Irfan Pathan

With Pant set to enter the mega auction with a base price of ₹2 crore, ex-Indian all-rounder Irfan Pathan has backed the youngster to become the most expensive player in the auction. Pathan wrote on X:

"Mitchell Starc's auction record is in danger. @RishabhPant17 is ready to break it!"

Starc shattered the IPL auction records as he fetched ₹24.75 from the Kolkata Knight Riders ahead of IPL 2024.

# Come Australia, he'll get his juices going': Shastri bluntly tells Virat Kohli to 'get in the face', antagonise Aussies





India legend and former head coach Ravi Shastri, on Tuesday, told Virat Kohli to "get in the face" of the Australian team and antagonise the opposition in a bid to change his batting fortunes in the upcoming Border-Gavaskar Test series, which begins on Friday at the Optus Stadium in Perth.

Kohli will be the cynosure when he starts his campaign in Australia, given that the 36-year-old heads into the contest on the back of a lean form over the last four years. Since 2020, he has been averaging only 32 in Test cricket, with only two tons in 60 innings. The run comprises his tally of 93 against New Zealand earlier this month, which sparked concerns about his future in the format.

Shastri, as quoted by The West Australian, advised that Kohli has "mellowed with age," but advised him to return to the antagonist role, which he relished during the early parts of his career, including the 2012/13 and the 2014/15 tour of Australia.

"You mellow with age, don't you? But I think at the start of the Test series, you might just see (Kohli) firing again. He needs to be, I'd like to see him (like that) again," Shastri said.


"In the face, that's Kohli. Come Australia, he'll get his juices going. It's (about) how he starts off, and for Australia, it's with Steve Smith. These guys, don't write them off - because if they get cracking in the first two or three innings, they'll have a good series."

India had a practice match scheduled in Australia ahead of the Test series, an intra-squad match against India A at the WACA, but the BCCI cancelled it owing to injury concerns. Instead, they had a three-day match simulation.

Shastri said that he would have preferred India's first-choice XI to take on an organised team in a practice match, but admitted that the management must have carefully chalked out the intra-squad game given that the players headed to Australia just a few days after the New Zealand series at home.

"It's always, 'how strong will the opposition be?' That's the first question you ask (planning a tour game)," he said.

# Manu Bhaker, Neeraj Chopra, Yashasvi Jaiswal, Smriti Mandhana and Harmanpreet Singh are winners at 5th Indian Sports Honours





On a night that aimed to celebrate the achievements of some of India's top sports personalities and athletes, the fifth edition of the esteemed Indian Sports Honours was held on November 9 in Mumbai.Conceptualised by Cornerstone Sport, the event saw renowned celebrities and sportspersons coming together to recognize India's success in sports and honour the extraordinary achievements of the athletes in the Olympics, Paralympics, Asian Games, Commonwealth Games, and other key sports. Manu Bhaker, Neeraj Chopra, Smriti Mandhana and Harmanpreet Singh were honored with the top honours by the jury as a recognition of their illustrious achievements and unwavering dedication towards their respective sports.Manu won the Sportswoman of the Year in individual sports honour. She made her mark on the world stage after winning two bronze medals in the 10 meter air pistol women's event and 10 meter air pistol mixed team event at the Paris Olympics 2024. Her precision, focus, and groundbreaking successes on the world stage have made her one of India's most revered athletes in the sport. This wasn't Manu's first ISH Honour. She was the Emerging Sportswoman of the Year in 2019 as well. Upon winning the award she said, "I want to express my deepest gratitude to the jury and to the Indian Sports Honours, for bestowing me with this honour. This award is not just mine; it's for my family, my coaches, and for everyone who supported me and believed in me in this journey." Neeraj Chopra, two-time Olympics medallist, was honoured with the 'Sportsman of the Year' in individual sports. An Olympic gold medal winner in 2020, he bagged two silver medals this year, winning at the Paris Olympics and the Diamond League in Brussels. His accolade at the Indian Sports Honours 2024 recognizes his sustained excellence and his pivotal role in inspiring a new generation of Indian athletes. This was Neeraj Chopra's second ISH honour, having won the Sportsman of the Year last time out as well. Acknowledging the honour, he said, "Thank you to the jury for the honour and congratulations and all the best to all the other winners. Also thank you to my whole team without whom I won't be where I am today." Smriti Mandhana won the Sportswoman of the Year in team sports for her strong performances with the bat for India and as captain of Royal Challengers Bengaluru in the Women's Premier League. Mandhana's consistent performances, strategic prowess, and influential role in popularizing women's cricket have solidified her position as a leader in Indian team sports. This was her second Sportswoman of the Year in team sports honour, after having won it in 2019. Indian hockey team captain, Harmanpreet Singh won the Sportsman of the Year in team sports honour. A true leader, he helped India win the bronze medal in the 2024 Paris Olympics. Harmanpreet also led the team to their Asian Champions Trophy title this year.

■ Here is the complete list of all the ISH 2024 winners:

- ■ Sportsman of the Year (Individual Sport) - Neeraj Chopra
- ■ Sportswoman of the Year (Individual Sport) - Manu Bhaker
- ■ Sportsman of the Year (Team Sport) - Harmanpreet Singh
- ■ Sportswoman of the Year (Team Sport) - Smriti Mandhana
- ■ Coach of the Year (Male) - Jaspal Rana
- ■ Coach of the Year (Female) - Suma Shirur
- ■ Team of the Year (Male) - Indian Hockey Team
- ■ Team of the Year (Female) - Chess
- ■ Star Sports Believe Honour - Yashasvi Jaiswal
- ■ Para Athlete of the Year (Male) - Sumit Antil
- ■ Para Athlete of the Year (Female) - Avani Lekhara
- ■ SSF Grassroots Initiative Of The Year Honour - Mrida Education University
- ■ Popular Choice Breakthrough Performance of the Year (Male) - Yashasvi Jaiswal
- ■ Popular Choice Breakthrough Performance of the Year (Female) - Shreyanka Patil
- ■ Popular choice Club of the Year - Kolkata Knight Riders
- ■ Popular Choice Fan club of the Year - Manjappada (Kerala Blasters)
- ■ Lifetime Achievement Honour - Padma Shri Murlikant Petkar



# एक कोटींचा गांजा जप्त

● छत्रपती संभाजीनगर, दिगंबर जाधव :

जिल्ह्यातील करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी ४९४ किलो वजनाची गांजाची झाडे पकडण्यात आली असून, त्याची किंमत एक कोटी रुपये आहे. या प्रकरणी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला. लामकाना येथे दोन ठिकाणी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भारत निकाळजे यांनी दिली. लामकाना येथील गट क्रमांक १८५ व गट क्रमांक ११३ येथील शेतातील तूर व कापसाच्या पिकात गांजाची रोपे लावण्यात आली होती. या संदर्भातील माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरन कमलअली चांद शहा आणि चंद्रकांत रघुनाथ बारबैले यांच्या शेतात ठापा टाकण्यात आला. त्यात एका शेतात गांजाची ९४ झाडे तर दुसरीकडे ८२ झाडे होती. चाँद यांच्या शेतातून २५४ किलो म्हणजे ५० लाख ८२ हजार किमत असलेली तर २४१ किलो गांजा बारबैले यांच्या शेतातून जप्त करण्यात आला. त्याची किंमत ४८ लाख २५ हजार रुपये असून, कमलअली चाँद शहा याला अटक करण्यात आली आहे.

# मुंबई सेन्ट्रल रेल्वे टर्मिनस येथून ४२ लाख जप्त

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई सेन्ट्रल टर्मिनस येथे रेल्वे पोलिसांनी केलेल्या कारवाईत ४१ लाख ९१ हजार रुपये मुंबई लोहमार्ग पोलिसांनी जप्त केले. याप्रकरणी प्राप्तिकर विभागाला माहिती देण्यात आली असून ते याबाबत पुढील तपास करत आहेत, असेही पोलिसांनी सांगितले.

मुंबई सेन्ट्रल टर्मिनसहून सुटणारी डाऊन १२९५३ ऑगस्ट क्रांती एक्स्प्रेसमधून एक प्रवासी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम घेऊन जाणार असल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या




आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक एच. टी. कुंभार व प्रभारी पोलीस निरीक्षक एम. एस. घरटे यांनी दोन पथके तयार केली. मुंबई सेंन्ट्रल रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर ऑगस्ट क्रांती एक्स्प्रेस आल्यानंतर पोलीस पथकाने प्रवाशांची तपासणी करण्यास सुरूवात केली. त्यावेळी, बी-१ डब्यातील ७१ क्रमांक आसनावर बसलेला प्रवासी उसामा आसिम (२४) याच्या बॅगेची तपासणी केली असता त्यात रबर पॅटमध्ये पाचशे, दोनशे व शंभर रुपयांच्या नोटा सापडल्या. त्याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता तो समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही. त्यामुळे, उसामा याला फलाटावर उतरवून त्याच्याकडील ट्रॉली बॅगची दोन सरकारी पंचासमोर तपासणी करण्यात आली. त्यावेळी, त्यात ४१ लाख ९१ हजार रुपये आढळले. ते ताब्यात घेण्यात आले आहेत. विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने जप्त रोकडीबाबत निवडणूक भरारी पथक, प्राप्तिकर विभाग यांना माहिती देण्यात आली. आरोपी हा मुंब्रा परिसरातील रहिवासी आहे. सध्या प्राप्तिकर विभाग त्याची चौकशी करत आहे.

# विकास महाविद्यालयात 'एनएसएस युनिट' तर्फे मतदान जनजागृती

● मुंबई, राकेश गायकवाड :





पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये व आजच्या तरुण वर्गात मतदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने विक्रोळी येथील विकास कला, विज्ञान व वाणिज्य महविद्यालयाच्या एन.एस.एस. युनिट तर्फे शनिवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान जनजागृती फेरी आणि मतदान शपथ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाने लोकसभा निवडणुकीच्या वेळेसही सदर उपक्रमाचे आयोजन केले होते. एन.एस.एस. युनिट मधील विद्यार्थी आपले सामाजिक दायित्व म्हणून मतदान केंद्रावर विविध प्रकारे मदत करत असतात. राष्ट्रनिर्माणासाठी मतदान करा, तुमचे मत, तुमचा आवाज, उज्वल भविष्यासाठी, आजच मतदान करा" आदी जनजागृतीपर संदेश फलक हाती घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली. विकास महाविद्यालयातून हि फेरी निघाली व कन्नमवार नगर परिसरातून मार्गस्थ होऊन महविद्यालयात परत दाखल झाली. तसेच विविध घोषवाक्य पुकारत जनसामान्य नागरिकांचे लक्ष वेधून घेतले व त्यांना मोठ्या प्रमाणावर मतदान करण्याचे आवाहन केले. या फेरी मध्ये १५६ विक्रोळी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक आयोगाचे अधिकारीसुद्धा होते.

# आता पीएच.डी. प्रबंधाला मिळणार पुरस्कार... काय आहे युजीसीची नवी योजना?

● पुणे, सुचिता देशमुख :

गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'पीएच.डी. एक्सलन्स सायटेशन्स' हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत दरवर्षी विविध शाखांतील दहा पीएच.डी. प्रबंधांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार असून, १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील प्रबंध विचारात घेतले जाणार आहेत.

यूजीसीने या संदर्भातील मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधकांची दखल घेणे हा या पुरस्काराचा उद्देश आहे. त्यानुसार




अभियांत्रिकी, विज्ञान, समाजशास्त्र, भाषा अशा विद्याशाखांतील संशोधन प्रबंध पुरस्कारासाठी निवडले जाणार आहेत. संशोधनाचा अत्युच्च दर्जा दर्शवत ज्ञान, संशोधन पद्धती, स्पष्टता, परिणाम आणि परिणामकारक सादरीकरण हे घटक विचारात घेतले जाणार आहेत. पुरस्कार निवडीसाठीची प्रक्रिया दोन टप्प्यातं होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर आणि यूजीसी स्तरावर निवड समिती असणार आहे.

पीएच.डी. प्रबंधाला पुरस्कार देण्याच्या उपक्रमातून देशातील विद्यापीठांमध्ये केल्या जाणाऱ्या संशोधनाला आणि विविध विद्याशाखांतील संशोधकांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. पीएच.डी. प्रदान केलेले पाच प्रत्येक विद्यापीठाला १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या वर्षभराच्या कालावधीत पदवी प्रदान समारंभात विद्याशाखांतील पाच प्रबंध पुरस्कारासाठी नामांकित करता येणार आहेत.

## पीएच.डी. प्रवेशांत वाढ

■ यूजीसीने केलेल्या अभ्यासानुसार पीएच.डी. प्रवेशांकडील कल वाढत असल्याचे दिसून आले आहे. २०१०-११ मध्ये ७७ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी.ला प्रवेश घेतला होता. तर २०१७-१८ मध्ये १ लाख ६१ हजार ४१२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे आठ वर्षांमध्ये प्रवेश दुपटीने वाढले. पीएच.डी.च्या आकडेवारीचा आढावा घेतला असता विज्ञान शाखेत ३० टक्के, त्यानंतर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेत २६ टक्के, समाजशास्त्रात १२ टक्के, भारतीय भाषांमध्ये ६ टक्के, व्यवस्थापन आणि शिक्षण या शाखेत ५ टक्के, कृषिशास्त्रात ४ टक्के, वैद्यकीय शाखेत ५ टक्के, वाणिज्य शाखेत ३ टक्के, तर परदेशी भाषांमध्ये ३ टक्के विद्यार्थी पीएच.डी करत असल्याचे या अभ्यासातून निदर्शनास आले आहे.

# जळगाव जिल्ह्यात निवडणूक कर्मचाऱ्यांच्या वाहनाला अपघात, चार जण जखमी

● जळगाव, सचिन कदम :

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या एक दिवस आधी मंगळवारी किनगाव (ता.यावल) येथे साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे जात असलेल्या चार महिला कर्मचाऱ्यांच्या वाहनाला अपघात झाला. या अपघातात चार महिला कर्मचारी जखमी झाल्या असून, त्यांना तातडीने चोपडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार थंडावल्यानंतर मतदानासाठी प्रशासकीय तयारीला वेग आला आहे. मंगळवारी सकाळपासूनच मतदान केंद्रांसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पथके आपआपले सामान घेऊन केंद्रांकडे निघाल्याचे चित्र दिसत आहे. दुपारपर्यंत अनेक अधिकारी व कर्मचारी हे ईव्हीएम यंत्रे व मतदान साहित्यासह मंगळवारी मतदान केंद्रांकडे रवाना झाले. जळगाव येथून रावेर विधानसभा मतदारसंघात मतदान साहित्य घेऊन जाताना केंद्र अधिकारी म्हणून नियुक्ती असलेल्या शिक्षण विस्तार अधिकारी मीनाक्षी



सुलताने, प्राथमिक शिक्षिका ज्योती भादले, कविता बाविस्कर आणि लतिफा खान यांच्या वाहनाला यावल तालुक्यात किनगाव बुद्रुक गावाजवळ अपघात झाला. या अपघातात चारही महिला कर्मचारी जखमी झाल्याने त्यांना चोपडा येथे तातडीने हलविण्यात आले. अपघातामुळे मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा येऊ नये यासाठी तातडीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत जिल्हा प्रशासनाने काळजी घेतली असून, पर्यायी व्यवस्थेद्वारे मतदान साहित्य निर्धारित केंद्रांवर पोहोचविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

# तरुण मुलांचा अपघाती मृत्युने माथेरानवर दु:खाचे सावट

● माथेरान , दिगंबर जाधव :

माथेरानच्या दोन तरुणांचा अपघातात मृत्यू तर एक हे तरुण गंभीर जखमी हृदय हेलावणारी अतिशय दुःखद घटना आज माथेरान मधे घडली आहे साधारण १९ /२० वयोगटातील हे तरुण मित्र परिवार साज गावची जत्रा पाहण्यासाठी MH 46CS4066 या एक्टिवा बाईक वरुन गेले होते. दर्शन वेताल अजय आखाडे, प्रथमेश सोनावणे तिघे एकाच बाईक वरुन गेले होते जत्रेचा आनंद घेऊन रात्री हे परत येत असताना खोपोली हाल फाटा येथे समोर उभ्या असलेल्या कंटेनर गाडीला



ह्यांनी जोरदार ठोकर दिल्याने दर्शन वेतालचां जागीच मृत्यू झाला तर अजय आखडे याचा हॉस्पीटल ला घेऊन जात असताना मृत्यू झाला तिसरा प्रथमेश सोनावने वर एम जी एम हॉस्पीटल मधे उपचार सूरू आहेतं. आनंदात अति प्रमाणात तरुणाई आत्मघाती निर्णय घेत असतात एक वेगळा भावना प्रकार जो कधी अनुभवलं नसतो त्याचे आनंदाच्या भरात अवलंब करताना दिसतात आणि स्वत:बरोबर संपूर्ण कुटुंबाला संकटात टाकले जाते सध्या सोशल मीडियावर रील बनवणे क्लिप टाकणे आणि त्याचे व्ह्यूज मिळवणे यासाठी धाडसी निर्णय घेतले जातात दुसरा आनंद साजरा करण्याचा मोठा कल तरुणांचा म्हणजे मध्य प्राशन कडे वळला आहे दंगामस्ती धांगडधिंगा, छेडछाड अशा अनेक घटना होत असतात यापेक्षा चिंताजनक दारूच्या नशेत गाडी चालवणे बाईकवर दोन दोन तीन सीट घेऊन वेगाने चालवणे यामध्ये यमदूत चौथ्या सीटवर बसलेला असतो.

# प्रचार फेऱ्यांमुळे वाहतूक कोंडी

● नाशिक, नितीन देवळेकर :

विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी अवघ्या काही तासांचा कालावधी शिल्लक असताना जाहीर प्रचाराचा समारोप सोमवारी सायंकाळी झाला. तत्पूर्वी राजकीय पक्ष, उमेदवारांकडून फेरीच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्यात आले. उमेदवारांच्या राजकीय शक्तिप्रदर्शनामुळे शहरातील अनेक भागात वाहतूक व्यवस्था कोलमडली. वाहनधारकांना वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागले.

सोमवारी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी थांबली. जाहीर प्रचाराच्या शेवटच्या क्षणापर्यंत नाशिक पूर्व, नाशिक मध्य, नाशिक पश्चिम, देवळाली या मतदारसंघातील उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठी घेतल्या. वेगवेगळ्या सामाजिक संघटनांच्या, जातींच्या पदाधिकाऱ्यांची, धर्मगुरूंची भेट घेत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. उमेदवारांच्या समर्थकांकडूनही मतदारसंघनिहाय दुचाकी फेरी काढून शक्तिप्रदर्शन करण्यात आले. अनेक ठिकाणी उमेदवारांकडून चित्ररथ काढण्यात आले. आपण केलेल्या कामाची माहिती देणारी पत्रके उमेदवारांकडून वाटण्यात आली. उमेदवार तसेच राजकीय पक्षांकडून कार्यकर्त्यांच्या नाश्ता, जेवणाची तसेच येण्या जाण्याची



व्यवस्था केली गेली.

शहरात वेगवेगळ्या ठिकाणांहून निघालेल्या उमेदवारांच्या फेऱ्यांमुळे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक विभागाच्या वतीने फेऱ्यांमुळे होणारी गर्दी पाहता नियोजन करण्यात आले होते. परंतु, त्यांचे नियोजन कोलमडले. उमेदवारांच्या फेऱ्यांमुळे वाहतूक खोळंबा झाला. ठिकठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्या. यामुळे शाळेत जाणारे विद्यार्थी, कामावर जाणाऱ्यांना उशीर झाला. काहींनी द्राविडी प्राणायाम करत इच्छित ठिकाण गाठले. त्यासाठी त्यांना नेहमीपेक्षा अधिक अंतर पार करावे लागले. काहींची कोंडीतून सुटका करुन घेताना दमछाक झाली.


## वाहतूक नियम धाब्यावर

■ राजकीय पक्षाच्या उमेदवाराकडून काढण्यात आलेल्या दुचाकी फेरीत वाहतूक नियम धाब्यावर बसविण्यात आले. शहर परिसरात वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारणाऱ्या पोलिसांनी हतबल होत केवळ बघ्याची भूमिका घेतली. वाहनांच्या माध्यमातून काढलेल्या फेरीत दुचाकीवर तीनपेक्षा अधिक जण स्वार, हेल्मेट नसणे, कर्णकर्कश भोंगे वारंवार वाजविणे, आवाजाचा दणदणाट, पायी फेरीत वाहतुकीला अडथळा येईल, अशी कृती समर्थकांकडून सुरू राहिली.

# प्रदूषणामुळे फुफ्फुसरोगाच्या धोक्यात वाढ! खराब हवेमुळे आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होताहेत...

● पुणे, अभिजित येरल्लू :

थंडी सुरू झाल्यानंतर श्वसनविकारांमध्ये सर्वसाधारणपणे वाढ होते. यंदा अशा रुग्णांमध्ये मोठी वाढ दिसून येत आहे. दिवाळीच्या कालावधीत प्रदूषणामुळे बिघडलेली हवेची पातळी याला कारणीभूत ठरली आहे. या पार्श्वभूमीवर प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या फुफ्फुसरोगाच्या धोक्याकडे श्वसनविकारतज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. यंदा दिवाळीत फटाक्यामुळे पुण्यातील हवेची पातळी खालावली. हवा गुणवत्ता निर्देशांक खराब पातळीवर पोहोचला. दरवर्षी हिवाळ्याच्या सुरुवातीपासून थंडी वाढू लागताच श्वसनविकाराचे रुग्ण मोठ्या संख्येने दिसून येतात. याचबरोबर हवामानात अचानक झालेला हा बदल विषाणूंच्या वाढीस पोषक ठरतो. यामुळे विषाणूसंसर्गांमध्येही या काळात वाढ होते. यंदा दिवाळीनंतर श्वसनविकाराचे रुग्ण वाढले आहेत. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज २०१९ या अभ्यासानुसार, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) म्हणजेच दीर्घकालीन अवरोधी फुफ्फुसरोग हा सर्वात प्रचलित परंतु कमी ओळखला जाणारा श्वसन विकार आहे.



सीओपीडीचा त्रास सुमारे ५.५ कोटी भारतीयांना आहे. हे देशातील मृत्यूंचे दुसरे प्रमुख कारण आहे. या पार्श्वभूमीवर सीओपीडीच्या वाढत्या धोक्याकडे श्वसनविकारतज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. याबाबत श्वसनविकारतज्ज्ञ डॉ. महावीर मोदी म्हणाले की, सीओपीडीसारख्या दीर्घकालीन श्वसनरोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आणि पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी लवकर निदानासोबत उपचार महत्त्वाचे आहेत. स्पायरोमेट्री ही फुफ्फुसाची कार्यक्षमता चाचणी आहे. तिच्या आधारे सीओपीडीचे लवकर निदान करता येते. अनेक जण वृद्धत्व, सामान्य फ्ल्यू किंवा धूम्रपान करणाऱ्यांचा खोकला म्हणून प्राथमिक लक्षणे नाकारतात. म्हणून रुग्णांना या आजाराबाबत योग्य माहिती मिळायला हवी.

## रुग्णांसाठी 'ब्रीदफ्री' उपक्रम

■ जगभरात दरवर्षी २० नोव्हेंबरला जागतिक सीओपीडी दिन साजरा केला जातो. सीओपीडीच्या रुग्णांना निदानापासून उपचारापर्यंत मार्गदर्शन करण्यासाठी ब्रीथफ्री उपक्रम राबविला जात आहे. रुग्णांना दैनंदिन व्यायाम आणि तंदुरूस्त राहण्यासाठीची माहिती या उपक्रमांतर्गत दिली जात आहे. 'ब्रीदफ्री' उपक्रमाची सर्व माहिती http://www.breathefree.com पुढील संकेतस्थळावर रुग्णांना उपलब्ध होत असून, त्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होत आहे.

■ प्रदूषणामुळे श्वसन विकारांमध्ये वाढ होत आहे. दिवाळीच्या काळात पुण्यातील हवा प्रदूषणामुळे विषारी बनली होती, त्यामुळे अशा रुग्णांची संख्या जास्त दिसून येत आहे. याचबरोबर धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींमध्येही हा धोका वाढत आहे. रुग्णांनी त्रास सुरू झाल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत. -डॉ. संजय गायकवाड, प्रमुख, श्वसनरोगशास्त्र विभाग, ससून सर्वोपचार रुग्णालय

# मतदानासाठी ३० हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा

● मुंबई, विशाल पाटील :

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत ठिकठिकाणी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. ३० हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात येणार आहे. साडेचार हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी म्हणून मुंबई पोलीस दलाने पाच अपर पोलीस आयुक्त, २० पोलीस उप आयुक्त, ८३ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह दोन हजारांहून अधिक पोलीस अधिकारी व २५ हजारांहून अधिक पोलीस अंमलदार, ०३ दंगल नियंत्रण पथके असा फौजफाटा बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आला आहे. तसेच वाहतूक विभागामार्फत स्वतंत्रपणे १४४ अधिकारी व एक हजाराहून अधिक पोलीस अंमलदार बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्यासोबत चार हजारांहून अधिक गृहरक्षक दलाचे जवानांना तैनात करण्यात आले आहे. याशिवाय महत्त्वाच्या ठिकाणी २६ केंद्रीय सुरक्षा दले / राज्य सुरक्षा दले यांची निवडणूक कामासाठी नेमणूक करण्यात आली आहे.मतदान केंद्रालगतच्या १०० मीटर परिसरात मोबाइल अथवा वायरलेस यंत्रणा, तसेच परिसरात बॅनर, ध्वनीक्षेपक, मेगोफोनचा वापर करण्यास बंदी आहे. याशिवाय मतदान केंद्र, परिसरात मतदार व निवडणूक आयोगाचे अधिकारी वगळता इतर कोणतीही व्यक्ती घुटमळणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.